**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक १३.०५.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

## १) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—

दिनांक ११.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०९ केसेसमध्ये ११ ईसमांवर कारवाई करून ७,०२१/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०१ ईसमावर कारवाई करून ७,४६०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,४२२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,४०,१००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

## २) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.

दिनांक ३०.०४.२०२६ चे २१.०० वा. ते दि. ०१.०५.२०२६ चे ०६.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे अजनी हद्दीत, इंद्रप्रस्थ सोसायटी, प्लॉट नं. १६७, ओंकार नगर, रेड झोन कॅफे समोर, नागपूर येथे फिर्यादी हर्ष कांतीलाल डोंगरे, वय २५ वर्षे, रा. प्लॉट नं. ३३५, काशी नगर, शताब्दी चौक, अजनी, नागपुर यांनी त्यांची के.टी.एम. मोटरसायकल क्र. एम.एच. ४९ बि.जी. २००८ ही लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची मोटरसायकल चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा त्याचे ईतर दोन साथीदार यांचेसह संगणमताने केल्याची कबुली दिली. विधीसंघर्षग्रस्त बालकाचे ताब्यातुन चोरी केलेले दुचाकी वाहन किंमती अंदाजे ९०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. विधीसंघर्षग्रस्त बालकास मुद्देमालासह पुढील कारवाईकामी अजनी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनात, वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— दुकान फोडून चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी नाजमा सिराज खान, वय ४२ वर्षे, रा. प्लॉट नं. ३१, रामकृष्ण नगर, दिघोरी यांचे पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, शॉप नं. ०५, आयुषी अपार्टमेन्ट, दिघोरी चौक, नागपुर येथे हैद्राबाद कार डेकोर नावाचे दुकान असुन, ते फिर्यादीचे पती चालवितात. फिर्यादीचे शॉपचे बाजूला असलेले शॉप नं. ०६ हे फिर्यादी यांनी दिनांक २४.०९.२०२५ रोजी राजकुमार भोजवाणी यांचेकडून विकत घेतले होते. परंतु, त्या दुकानावर आरोपी सलीम खान अकबर खान पठाण, वय ४५ वर्षे, रा. अवलीया नगर, कब्रस्तान जवळ, मोठा ताजबाग, सक्करदरा याचे अतिक्रमण होते. दिनांक १४.१२.२०२५ रोजी फिर्यादी व त्यांचे पती दुकानाचा ताबा घेण्याकरीता गेले असता, आरोपीसोबत झगडा—भांडण होवून, त्यामध्ये आरोपीस गंभीर दुखापत झाल्याने पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे गुन्हा दाखल झाला होता. तेव्हापासून फिर्यादीने दुकान बंद ठेवले होते. दिनांक ११.०५. २०२६ चे १७.०० वा. फिर्यादीचे पतीने त्यांचे शॉप नं. ०५ उघडले असता, दुकानात ठेवलेले कार डेकोरचे संपूर्ण सामान गायब होते. तसेच, शॉप नं. ०६ ला लागून असलेली आतील कॉमन भिंत तोडून तेथे नवीन भिंत तयार केल्याचे दिसले. दिनांक १७.१२.२०२५ चे ०४.०० वा. ते दिनांक ११.०५.२०२६ चे १७.०० वा. चे दरम्यान, आरोपीने फिर्यादीचे दुकानाला लागून असलेली कॉमन भिंत तोडून आंत प्रवेश करून, दुकानातील कार डेकोरचे सामान वेगवेगळे म्युझीक प्लेअर, स्टीकर, कॅमेरे, लेदर शिट, लाईट, लॅमीनेशन व रोख ५,०००/—रू. असा एकुण किंमती ८,४९,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे मपोउपनि. आरती कारंडे ७०२०६६२१८८ यांनी आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४), ३२९ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे शांतीनगर :— घातक शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १३.०५.२०२६ चे ०८.०० वा. ते ०८.३० वा. दरम्यान, शांतीनगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, लालनगर हमीद काल्याचे घराजवळ शांतीनगर येथे एक ईसम शस्त्र हातात घेवुन, येणाऱ्या—जाणाऱ्या लोकांना शिवीगाळ करून, धुमधाम करीत आहे. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा ईसम हातात लोखंडी चाकू घेवुन धुमधाम करतांना दिसुन आला. त्यास स्टाफचे मदतीने ताब्यात घेवुन त्यास निशस्त्र केले. आरोपीस त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव अब्दुल रहेमान उर्फ रम्मु वल्द अब्दुल रजाक, वय ३६ वर्षे, रा. मुद्लीयार ले—आऊट, नरेश पान ठेल्याजवळ, शांतीनगर, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकू किंमती अंदाजे ५००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. स्वामी डोकरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस

ठाणे शांतीनगर येथे पोउपनि. बी.पी. आव्हाळे ९३७०९८९८४० यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे जरीपटका</u> :—** दिनांक १३.०५.२०२६ चे ०८.२७ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, नारा गाव, जे.पी. लॉन समोरील मोकळ्या मैदानात एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४५ वर्षे, रंग सावळा, बांधा मध्यम, दाढी काळ्या पांढऱ्या रंगाची वाढलेली, डोक्याचे केस वाढलेले, अंगात आकाशी रंगाचा काळे पट्टे असलेला चेक्सचा शर्ट व निळ्या रंगाची हाफ पॅन्ट घातलेल्या वर्णनाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद वर्णनाचे मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे जरीपटका येथे संपर्क साधावा.

यात्प्रकरणी फिर्यादी सरतर्फे पोअं. अमोल हरणे यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. खुटवळ ९०९६९५३२८६ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे भांडेवाडी</u> :—** सच्चीदानंद बाळासाहेब चतुरे, वय ३२ वर्षे, रा. शैलेष नगर, सिंधू पराते यांचे घराजवळ, नागपूर हे दिनांक ०४.०५.२०२६ चे ०५.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— मजबूत, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे, अंगात— लाल रंगाचा टी—शर्ट व काळ्या ग्रे रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— डाव्या हातावर ''सच्चीदानंद चतुरे'' नांव गोंदलेले आहे.



सच्चीदानंद

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०२, नागपुर. | ३०५०१७७ /२००१ | कलम ३२४ भा.दं.वि. | सुरज रंगदेवसिंग ठाकुर, रा. जरीपटका, हुडको कॉलोनी क्वॉटर नं. ४४ नागपूर. | १५.०५.२०२६ |

स्वा/—

( नितीन चुलपार )
सहा.पोलीस निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.

महाराष्ट्र शासन

# कार्यालय पोलीस आयुक्त, नागपूर शहर

पोलीस भवन, वेस्ट हायकोर्ट रोड, सिव्हिल लाईन्स्, नागपूर - ४४०००१.

दुरध्वनी क्र. ०७१२–२५९०६०१ Email ID:- cp.nagpur@mahapolice.gov.in

जा.क्र. पोआना/गुन्हे/अधिसूचना/२०२६ -२४२ नागपूर शहर दिनांक : ०७/०५/२०२६

## अधिसूचना

### (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम १६३ अन्वये)

ज्याअर्थी, आमचे असे निदर्शनास आले आहे की, नागपूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत काही ठिकाणी घरमालक/मालमत्ता धारक/एजंट हे भाडेकरूंना (फ्लॅट/खोली/घर) देतांना आवश्यक माहिती व पडताळणी संबंधित पोलीस ठाण्यास न देता राहणेकरीता जागा भाडेतत्वावर देतात,

आणि ज्याअर्थी, अशा प्रकारच्या निष्काळजीपणामुळे अस्थायी स्वरूपात भाडे तत्तवावर राहणे करीता जागा (फ्लॅट/खोली/घर) घेणाऱ्या भाडेकरू बाबत आवश्यक ती माहिती संबंधीत पो.ठाणे येथे उपलब्ध नसल्याने एखादी अप्रिय घटना घडून कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण होण्याची शक्यता असून बेकायदेशीर कृत्यांना चालना मिळू शकते. तसेच भाडेकरू यांचे बाबत इत्यंभूत माहिती उपलब्ध नसलयाने त्यांचा शोध लावण्यात अडचणी येतात.

आणि ज्याअर्थी, वरील बाबी लक्षात घेता, नागपूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत भाडेतत्वावर राहत असलेल्या व्यक्तींची ओळख व नोंद व्यवस्थित ठेवण्यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

आणि म्हणून मी, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम १६३ मधील संबंधित तरतुदींनुसार खालीलप्रमाणे आदेश जारी करीत आहे.

१) सर्व घरमालक/मालमत्ता धारक/एजंट यांनी भाडेकरू ठेवण्यापूर्वी किंवा ठेवल्यानंतर ४८ तासाचे आत त्यांची संपूर्ण माहिती संबंधीत पोलीस ठाण्यात सादर करणे बंधनकारक राहील. सदर माहिती सादर करतांना भाडेकरू व त्याचे परिवारातील इतरांची संपुर्ण नावे, कायम पत्ता, पुर्वी राहत असलेल्या ठिकाणचा पुर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक, ओळखपत्रे (आधारकार्ड, पॅनकॉर्ड, निवडणुक ओळखपत्रे, वाहन परवाना इ.) छायाचित्रे, भाडे करारनामा, व भाडेकराराची कालावधी अशी सर्व माहिती संबंधीत पोलीस ठाणे येथे सादर करणे बंधनकारक राहील.

२) भाडेकरू हा परदेशी नागरिक असल्यास त्याचा पासपोर्ट/व्हिसा संपूर्ण माहिती व FRRO नोंदणीची माहिती देणे आवश्यक राहील.

३) सर्व घरमालक/मालमत्ता धारक/एजंट यांनी भाडेकरू ठेवतांना पोलीसांना पूर्वसूचना न देता व संबंधीत भाडेकरूची संपूर्ण पडताळणीशिवाय कोणालाही राहणे करीता भाडेतत्तवावर जागा उपलब्ध करून देऊ नये.

४) बेकायदेशीर स्थलांतरित/कागदपत्र नसलेल्या व्यक्तींवर विशेष लक्ष ठेवणे करीता व त्यांचे विरूध्द कायदेशिर कारवाई करणे करीता पोलीसांकडून तपासणी व पडताळणी मोहिमा राबविण्यात येईल.

५) या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधीत घरमालक/मालमत्ता धारक/एजंट हे भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २२३ नुसार गुन्हा दाखल होण्यास पात्र राहतील.

६) याबाबत सर्व नागरिकांनी पोलीसांना सहकार्य करावे व कोणतीही संशयास्पद बाब त्वरीत जवळच्या पोलीस ठाण्यास किंवा डायल ११२ वर कळवावी.

सदर आदेश दि. ०८/०५/२०२६ चे ००.०१ वा. पासून ते दि. ०७/०७/२०२६ चे २४.०० वा. पर्यंत लागु राहील.
हा आदेश दि. ०७/०५/२०२६ रोजी माझे सही शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.

ठिकाण — नागपूर शहर

(डॉ.रविन्द्र कुमार सिंगल)
पोलीस आयुक्त,
नागपूर शहर.